Dr. An[illegible] Chidrawa[illegible]
I/C Principal
A.V. Ed[illegible]
Degloor College, [illegible]

ISSN 2395 - 4094

# लोक प्रशासन पत्रिका

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
विचार विशेषांक



वर्ष दुसरे, अंक तिसरा । जोड अंक
जानेवारी-जुन २०१६ । जुलै-डिसेंबर २०१६

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

# लोक प्रशासन पत्रिका

ISSN 2395-4094

वर्ष - २ : अंक - ३    जानेवारी-डिसेंबर - २०१६

● मुख्य संपादक

शाम शिरसाठ

प्राध्यापक, लोक प्रशासन विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

● संपादक

जितेंद्र वासनिक

सहायक प्राध्यापक, लोक प्रशासन व स्था.स्व.शा. विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

## वर्गणी (देणगी)

व्यक्तीसाठी : वार्षिक ३००/- रु.

पंचवार्षिक : १२००/- रु.

आजीवन : १०,०००/- रु.

संस्थेसाठी : वार्षिक ५००/- रु.

पंचवार्षिक २०००/- रु.

चेक पाठविल्यास ५० रु. वटणावळ अधिक पाठवावी. शक्यतो रक्कम लोक प्रशासन पत्रिकेच्या बँक खात्यावर सरळ हस्तांतरित करावी.

A/C Name : Lok Prashasan Patrika
Bank : Bank of India
Branch : RTM Nagpur University, Campus, Amravati Road, Nagpur-440033.
A/C No. : 87622011000048
IFSC Code : BKID0008762

या अंकाचे मूल्य : १५०/- रु.

संपर्क :-

Eamil : lokprashasanpatrika@gmail.com
भ्रमणध्वनी : ९८६०४६६९२५ / ९४२२२०९४२०

● सल्लागार मंडळ

पारस बोरा

निवृत्त प्राध्यापक, लोक प्रशासन विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

नंदकुमार नाईक

निवृत्त प्राध्यापक, लोक प्रशासन विभागं,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

नीलिमा देशमुख

प्राध्यापक, लोक प्रशासन व स्था.स्व.शा. विभाग,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

वासंती रासम

प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

के. आर. वंग

निवृत्त प्राध्यापक, लोक प्रशासन विभाग,
वैद्यनाथ महाविद्यालय, परळी, जि. बीड.

रमेश ढोबळे

निवृत्त प्राध्यापक, राज्यशास्त्र व लोक प्रशासन विभाग,
सरस्वती भुवन कला व वाणिज्य महा., औरंगाबाद.

सतीश दांडगे

प्राध्यापक, लोक प्रशासन विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

लक्ष्मण कोत्तापल्ले

निवृत्त प्राध्यापक, लोक प्रशासन विभाग,
नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड.

सुभाष भिंगे

निवृत्त प्राध्यापक, लोक प्रशासन विभाग,
दयानंद महाविद्यालय, लातूर.

मृदुल निळे

सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र व नागरिक शास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

बाबासाहेब मुंढे

सहायक प्राध्यापक, राज्यशास्त्र व लोक प्रशासन विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

©लोक प्रशासन पत्रिका

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist.Nanded



# लोक प्रशासन पत्रिका

जोड अंक
जानेवारी - जून २०१६
जुलै - डिसेंबर २०१६
वर्ष-२ : अंक - ३

संपादकीय / ४

मुक्तचिंतन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संघराज्य - लक्ष्मण कोत्तापल्ले / २

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सर्वव्यापी विचार - भास्कर एम. गणवीर / ९

डॉ. आंबेडकर, संविधान आणि सामाजिक न्याय - जे.यू. हाटकर / १७

लेख

डॉ. आंबेडकरांचे कामगार धोरण व प्रशासन - आर.बी. शेजूळ / १९

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जल नियोजनातील योगदान - मृदुल निळे / २४

छोटी राज्ये, संविधान आणि आंबेडकर - माधव चोले / २९

डॉ. बी.आर. आंबेडकर यांचे प्रशासन विषयक विचार - सुरेश गजभारे व श्यामसुंदर वाघमारे / ३५

ग्रंथ परीक्षण

भारतीय प्रशासनापुढील समस्यांचा लेखाजोखा - बाबसाहेब मुंढे / ४३

संस्मरण

डॉ. किशोर महाबळ - शैलेंद्र लेंडे / ४६

DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

# छोटी राज्ये, संविधान आणि आंबेडकर

माधव चोले

विशेषतः स्वातंत्र्योत्तर काळात मोठ्या राज्यातून छोट्या राज्यांच्या मागण्या कमी-अधिक प्रमाणात गेल्या अनेक वर्षापासून चळवळीच्या, हिंसात्मक आंदोलनाच्या माध्यमातून येतांना दिसतात. त्या भाषिक अलगता, सांस्कृतिक वेगळेपणा, प्रादेशिक अस्मिता आणि सामाजिक व आर्थिक मागासलेपणाच्या कारणांनी करण्यात आलेल्या आहेत. निवडणुकीच्या तोंडावर उत्तरप्रदेशच्या मुख्यमंत्री मायावती यांनी उत्तरप्रदेशांचे चार राज्यात विभाजन करण्याचा ठराव विधानसभेत मंजूर करून घेतला आणि छोट्या राज्यांचा मुद्दा पुन्हा चर्चेला आला. फेब्रुवारी २०१३ मध्ये नागपूरच्या भव्य सभेत परत मायावतींनी विदर्भ राज्याची मागणी पूर्ण करू असे सूचित केले. अगोदरच आंध्रातून स्वतंत्र तेलंगणा राज्यासाठी तीव्र आंदोलने होत होती. तेलंगणाची प्रेरणा घेवून स्वतंत्र विदर्भाची ही मागणी महाराष्ट्रात जोर धरू शकते. तसेच भारतातील मोठ्या राज्यांतून छोट्या राज्यांच्या मागण्या सातत्याने येत आहेत. त्यात पश्चिम बंगालमधून गुरखा लँड, आसाममधून बोडोलँडची, ओरिसातून कोशलांचल, कर्नाटकातून कुर्ग, उत्तर बिहार, उत्तर प्रदेशचा काही भाग आणि पश्चिम बंगालचा काही भाग मिळवून मिथिलांचलची मागणीही आहे. या पार्श्वभूमीला संविधानात राज्य निर्मितीचे उपबंध काय आहेत, आंबेडकरांचे त्यावेळचे छोट्या राज्यासंबंधीचे विचार, त्यावेळची पूर्ण राजकीय परिस्थिती, नेतृत्व, पक्षपध्दतीचे स्वरूप अशा परिस्थितीत छोटी-छोटी राज्य निर्माण केले तर काय झाले असते. कोणते राजकीय बदल झाले असते. आजच्या स्थितीत आंबेडकरांचे छोट्या राज्यासंबंधीचे विचार, आजची बदलती राजकीय परिस्थिती अशा परिस्थितीत आंबेडकरांच्या विचारावर आधारित

*आंबेडकरांनी तेव्हा मांडलेले विचार आपण २००० मध्ये विहारमधून-झारखंड, मध्यप्रदेशातून-छत्तीसगड आणि उत्तरप्रदेशातून-उत्तराखंड निर्माण करून पूर्ण केले आहे. हेच जर त्यावेळेस झाले असते तर उत्तरप्रदेशांचा समतल विकास झाला असता. मोठे राज्य ठेवल्याने काही मागास भाग राहिलेले आहेत. उत्तरप्रदेश, विहार, मध्यप्रदेश मोठे राज्य असल्याने शासनाच्या योजना दुर्गम, पहाडी भागातील जनतेपर्यंत जाऊन पोहोचण्यास अडचणी आल्या. त्यामुळे आज या तिनही राज्यात औद्योगिकरण नाही, पायाभूत सुविधा नाहीत, रोजगाराच्या संधी नाहीत. आज त्या राज्यांची जी दुर्दशा आहे ती राहीली नसती.*

माधव चोले (cholemadhav@gmail.com)
हे माधव चोले देगलूर महाविद्यालय, देगलूर, जि. नांदेड येथे राजशास्त्र विषयाने अध्यापन करतात.

SOCIETY'S ... COLLEGE ... Distinguished

छोटे राज्य निर्माण केले तर कोणत्या राजकीय अडचणी येवू शकतील. तसेच आजच्या आघाड्यांच्या राजकारणात अशी छोटी राज्ये निर्माण करताना पक्षीय राजकारणाचे मतभेद काय असतील याचा अभ्यास प्रस्तृत शोध निबंधात करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**राज्य निर्मितीचे संविधानात्मक उपबंध :**

संविधानामुळे राज्याच्या प्रचलित व्यवस्थेत व रचनेत बदल घडवून आणण्याचे अधिकार संसदेला आहेत. संसद कलम-३ नुसार नवीन राज्यांची निर्मिती, एखाद्या राज्यांच्या भौगोलिक क्षेत्रात घट अथवा वाढ करणे, राज्यांच्या सीमेत, नावात बदल करणे हे ठराव बहुमताने संमत करू शकते. पण प्रत्यक्षात नवीन राज्य निर्मितीच्या प्रक्रियेत अनेक पर्याय असू शकतात. त्यातला पहिला असा की विद्यमान राज्यातील एखादा व काही भूभाग वेगळा करून त्याला स्वतंत्र व नवीन राज्याचा दर्जा देणे. दुसरा पर्याय दोन किंवा दोनपेक्षा अधिक राज्यांचे एकत्रीकरण घडवून आणणे. अथवा दोन वा त्यापेक्षा अधिक राज्यांमधील काही प्रदेश एकत्रित करून त्याला नवीन राज्य म्हणून दर्जा देणे. अशा प्रकारचा कोणताही बदल करतांना संबंधित राज्यांशी विचार विमर्श करणे संसदेवर बंधनकारक असते.

राज्यनिर्मितीच्या प्रक्रियेत प्रथम राष्ट्रपतींची पूर्व संमती घेऊन केंद्रीय मंत्रिमंडळ राज्यनिर्मितीचा मसुदा तयार करते आणि राष्ट्रपतींकडे पाठविते. राष्ट्रपती हा मसुदा संबंधित राज्याकडे मत-मतांतरे घेण्यासाठी पाठवितात. हा समुदा राज्याने किती अवधीत द्यावा हे राष्ट्रपतीच ठरवितात. संबंधीत राज्याचे, राज्य निर्मितीचे मत केंद्र सरकार स्वीकारू शकते, नाकारू शकते. तसेच संबंधित राज्याने राज्य निर्मितीबाबतचे मत वारंवार देण्याची आवश्यकता नाही. राज्य निर्मितीबाबत फक्त राज्याला मत व्यक्त करता येते. याशिवाय राज्याला कोणताही अधिकार नाही. याबाबतीत संविधानाने संसदेला सर्वोच्च अधिकार दिलेले आहेत. संसद राज्याच्या अनुमतीशिवाय राज्य निर्मितीचे पाऊल उचलू शकते. त्याशिवाय संसद भारतीय राज्याची पुनर्रचना करू शकते. संविधान प्रादेशिक एकता अथवा राज्याच्या अस्तित्वाच्या गॅरंटी देवू शकत नाही. त्यामुळेच भारताला 'विभक्त राज्याचे अविभाज्य संघ' म्हणतात. संघ सरकार राज्य सरकारला समाप्त करू शकते. याच संदर्भात अमेरिकन संविधानाकडे पाहिल्यास असे दिसते की, अमेरिकेत संविधानाद्वारे प्रादेशिक एकता अथवा राज्यांच्या अस्तित्वाची गॅरंटी आहे. अमेरिकन संघ सरकार नवीन राज्याची निर्मिती अथवा त्याच्या सीमेत बदल हा संविधान राज्याच्या संमतीशिवाय करू शकत नाही. त्यामुळे अमेरिकन संघराज्याला 'अविभाज्य राज्याचा अविभाज्य संघ' असे म्हणतात. संसद अनुच्छेद-२ नुसार नवीन प्रदेश किंवा नवीन राज्याची निर्मिती करणे अथवा रद्द करणे, अनुच्छेद-३ नसार नवीन राज्य निर्माण करणे अस्तित्वात असलेल्या राज्याचे क्षेत्रफळ, सीमा, सीमारेषा आणि नाव बदलणे या अधिकारात ३६८ व्या कलमानुसार संधोधन करता येत नाही.

अर्थात राज्य निर्माण करण्याचा अधिकार हा साधारण विधायी प्रकियेद्वारे साध्या बहुमताने करता येते. केंद्र सरकारने भारत-पाकिस्तान करारनाम्यानुसार १९५८ ला बेरुबारी संघ (पश्चिम बंगाल) पाकिस्तानला देऊन टाकला. यावेळी असा प्रश्न उपस्थित झाला की, संसदेला असा पण अधिकार आहे का? भारताचा एखादा भूप्रदेश अन्य देशाला देता येतो. याबाबतीत बेरुबारी संघ आणि पश्चिम बंगाल या विवादात सर्वोच्च न्यायालयाने असे सांगितले की, संसदेला राज्याची सीमा समाप्त करणे आणि भारताच्या भूप्रदेशाला अन्य देशाला देता येत नाही. संसदेला हे कार्य अनुच्छेद ३६८ नुसार संविधानात संशोधन करून करता येते. अशाप्रकारे ९ वे संविधान संशोधन अधिनियम (१९६०) बेरुबारी संघ (पश्चिम बंगाल) पाकिस्तानला देण्यात आला. १९६९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला की, भारत आणि अन्य देशांमधील सीमा निर्मिती वाद-विवाद सोडविण्यासाठी संविधान संशोधन करण्याची आवश्यकता नाही. हे कार्य कार्यपालिकेद्वारे करता येते. यात भारतीय प्रदेशाला विदेशाकडे सोपविता येत नाही. हा मुद्दा यात समाविष्ट होत नाही.

राज्याचे मतप्रदर्शन आल्यानंतर राष्ट्रपती मंत्रिमंडळाकडे पाठवितात. मंत्रिमंडळ चर्चेसाठी संमतीसाठी संसदेकडे

ADARSH VIDYA ... EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

पाठविते. संसदेत राज्यनिर्मितीच्या मसुद्यानुसार २/३ बहुमताने ठराव संमत केल्यास राज्यनिर्मितीचा ठराव संमत होतो.

**आघाड्यांच्या राजकारणात राज्य निर्मितीचा प्रश्न :**

पहिला राज्य पुनर्रचना आयोग आला तेव्हा केंद्रात पक्षाचे बहुमताचे सरकार होते. म्हणून ते संमत झाले. आता सध्या आघाडी सरकारे केंद्रात आणि राज्यात आल्याने नवीन राज्यनिर्मितीचा मुद्दा गुंता-गुंतीचा बनलेला आहे. छोट्या राज्यांच्या मुद्यांवर पक्षांत मतभेद आहेत. भाजपाने समर्थन केलेले आहे. तर काँग्रेसने सुरुवातीपासूनच छोट्या राज्याला विरोध केलेला आहे. जसे नेहरूंनी विदर्भ राज्याला त्यावेळी केलेला विरोध तर इंदिरा गांधींनी तेलंगणा निर्मितीला विरोध करून समतल विकास करण्याचे सूचित केलेले होते. काँग्रेसने तेलंगणाच्या बाबतीत स्पष्ट भूमिका घेतलेली होती. काँग्रेसला वाटते की छोटी राज्ये निर्माण झाली म्हणजे आपली त्या राज्यातील ताकत कमी होईल आणि त्या-त्या प्रांतातील प्रादेशिक पक्षाचे प्रभुत्व वाढेल, नेत्यांचे वर्चस्व वाढेल आणि काँग्रेस अल्पमतात येईल, यात सत्यताही आहे. समजा तेलंगणा राज्य झाले तर तेलंगणा राष्ट्र समिती आणि त्याचे नेते चंद्रशेखर रावांचे वर्चस्व वाढण्याची दाट शक्यता आहे आणि तसेच झाले. छोट्या राज्यनिर्मितीचा प्रश्न हा संसदेच्या बहुमतावर अवलंबून असला तरी संसदेत आघाड्यांच्या शासनामुळे संमत होण्याचा गुंता-गुंतीचा प्रश्न निर्माण होतो. त्यात पक्षांचे, नेत्यांचे हितसंबंध महत्त्वाचे बनू शकतात. तसेच ज्या राज्यातून या मागण्या येतात त्या राज्यात सुध्दा एकमत असत नाही. जसे तेलंगणाला, विदर्भाला स्थानिक पक्षांचा, संघटनांचा प्रचंड विरोध आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात छोटे राज्य निर्माण करणे हे जिकरीचे काम होणार आहे. केंद्रात युपीए-२ चे सरकार असताना त्यांनी छोटे राज्य निर्माण करण्याला विरोध केलेला होता. भाजपाचे मात्र समर्थन आहे.

**डॉ. आंबेडकरांची भूमिका :**

प्रकृती अस्वास्थ्यामुळे डॉ. आंबेडकर आपली साक्ष राज्य पुनर्रचना आयोगासमोर देवू शकले नाहीत. १९५५ मध्ये लिहिलेल्या 'भाषावार प्रांतरचना' या पुस्तिकेत त्यांनी प्रा. पण्णीकरांच्या भूमिकेला अनुमोदन दिलेले होते. 'एक राज्य एक भाषा' या तत्त्वानुसार भौगोलिकदृष्ट्या मोठ्या राज्यांचे प्रशासनाच्या व्यवस्थापनाच्या दृष्टीने आकाराने लहान राज्यांमध्ये विभाजन करण्यात यावे अशी त्यांची भूमिका होती. जगातल्या बहुसंख्य राष्ट्रांनी या तत्त्वाचाच स्विकार केलेला होता. त्यात जर्मनी, फ्रान्स, इटली इत्यादी. जेथे 'एक राज्य एक भाषा' हे तत्त्व नाकारले गेले तेथे ते राष्ट्र धोक्यात आल्याशिवाय राहिले नाही. ऑस्ट्रीया आणि तुर्कस्तान ही प्रभावशाली साम्राज्ये केवळ बहुभाषिक असल्यामुळे मोडकळीस आली होती. सुलभ प्रशासकीय व्यवस्थापनाच्या दृष्टीने आंबेडकरांचे विचार त्यावेळेस अंमलात आणणे सोपे गेले असते. कारण त्यावेळी एकपक्षीय राजवट आणि नेहरूंचे एकछत्री नेतृत्व असल्याने एका भाषेचे दोन या वा अनेक राज्य करणे सोपे गेले असते. जर ते केले असते तर एका भाषेचे दोन-तीन राज्ये निर्माण करून स्वतंत्र राज्यात राहण्याची सवय लागली असती. संसदीय लोकशाहीला पोषक प्रशिक्षणासाठी व राजकीय सामाजिकरणासाठी त्यावेळी अशी छोटी राज्य आवश्यक होती. आज मात्र प्रशिक्षणासाठी, राजकीय सामाजिकरणासाठी छोट्या राज्यांची आवश्यकता नाही कारण स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये राजकीय सामाजिकरण होते. त्यावेळीसुध्दा मराठी भाषिकांचे स्वतंत्र विदर्भ राज्याला विरोध होताच हे नाकारता येत नसले तरी त्यावेळेसच ते झाले असते तर प्रांतीय राजकारणाची एक वेगळी संस्कृती निर्माण झाली असती.

अर्थात भाषावादाला खतपाणी मिळाले नसते. पण त्यावेळी एक अडचण होती छोटी-छोटी राज्य निर्माण करण्यासाठी प्रशासनासाठी लागणारा खर्च कसा करायचा, त्यावेळी देशासमोर फाळणीनंतर विस्कटलेली अर्थव्यवस्था, प्रशासनव्यवस्था, निर्वासितांचे प्रश्न, पाकिस्तानशी युध्दजन्य परिस्थिती यामुळे नेहरूंनी भाषवार प्रांतरचनेकडे दुर्लक्ष करून टाळण्याचे, लांबणीवर टाकण्याचे वारंवार सूचित केलेले होते. त्यामुळे आंबेडकरांच्या मताकडे दुर्लक्ष झालेले होते. त्यावेळेस 'एक राज्य एक भाषा' असे झाले असते तर भारतात एक लोकशाहीला पोषक प्रांतीय राजकीय संस्कृती निर्माण झाली असती.

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded



आंबेडकरांच्या मते एकभाषिक मोठे राज्य निर्माण केल्याने भविष्यात भाषावाद वाढून एकात्मतेला धोका निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. तर बहुभाषिक राज्यांत नेतृत्वासाठी गटबाजी आणि राज्यकारभारातील भेदनिती या गोष्टी आढळतात. द्विभाषिक मुंबई राज्याची काय अवस्था झाली हे आपण उघड्या डोळ्यांनी पाहिलेलेच आहे. तमिळ आंध्राचे किंवा आंध्रा तमिळचे द्वेष करतात. आंध्रावाले महाराष्ट्राचे - महाराष्ट्रवाले आंध्राचे द्वेष करतात, गुजराती मराठी भाषिकांचे - मराठी भाषिक गुजरातचे, याचे कारण सोपे म्हणजे या दोन तऱ्हेच्या लोकांना बळजबरीने एकत्र आणून त्यांना शासन करण्यास भाग पाडले असल्यामुळे परस्परांमध्ये द्वेषांची भावना निर्माण झालेली होती. 'एक राज्य एक भाषा' या तत्त्वानुसार राज्यरचना झालीच तर जातीय वैमनस्य व सांस्कृतिक संघर्ष यासारखे राष्ट्रीय एकात्मतेला तडा देणारे वाद निर्माण होणार नाहीत. आंबेडकरांच्या मते राज्य पुनर्रचना आयोगाने उत्तर विरुध्द दक्षिण भारत ही नवीन समस्या निर्माण केलेली आहे. दक्षिण भारताचे एक भाषिक छोटे-छोटे राज्य निर्माण करून दक्षिण भारताचे विलगीकरण केले तर उत्तर भारताचे एक भाषिक उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, बिहार ही राज्ये मोठी ठेवली. अर्थात उत्तर भारताचे एकत्रीकरण केले यामुळे संसदीय राजकारणावर उत्तरेकडील लोकांचे वर्चस्व राहणार होते आणि ते राहिले. आंबेडकर म्हणतात याची प्रचिती आपणाला घटना परिषदेमध्ये राष्ट्रभाषा म्हणून हिंदीला प्राधान्य देताना घटना परिषदेमध्ये मतदान झाले त्यावेळीसुध्दा हिंदी भाषेला विरोध झाला होता. मतदान ७८ विरुध्द ७८ असे घडले होते. नंतर परत मतदान घेतले त्यावेळी ७७ विरुध्द ७८ असे झाले होते. त्यामुळे भाषेबाबत उत्तर/दक्षिणेची काट्यावर टक्कर होती. यावर आंबेडकरांनी पर्याय काढला, एकभाषिक मोठ्या राज्यांचे विभाजन करून लहान-लहान राज्य करण्याचे सुचित केले. त्यानुसार त्यांनी एकट्या उत्तर प्रदेशाचे पश्चिम उत्तर प्रदेश, मध्य उत्तर प्रदेश आणि पूर्व उत्तरप्रदेश अशी तीन राज्य निर्माण करून त्यांच्या राजधान्या अनुक्रमे मिरत, कानपूर व अलाहबाद करण्यात याव्यात तर बिहारचे उत्तर बिहार व दक्षिण बिहार अशी दोन राज्य निर्माण करून त्यांच्या राजधान्य पटणा व रांची करण्यात यावे. मध्यप्रदेशातून उत्तर मध्य प्रदेश आणि दक्षिण मध्य प्रदेश अशी दोन राज्य निर्माण करण्यात यावीत. महाराष्ट्राचे पश्चिम, मध्य आणि पूर्व महाराष्ट्र अशी तीन राज्ये वेगळी करावीत. तसेच मुंबईचे एक स्वतंत्र राज्य करावे या मताचे ते होते.

आंबेडकरांनी तेव्हा मांडलेले विचार आपण २००० मध्ये बिहारमधून-झारखंड, मध्यप्रदेशातून-छत्तीसगड आणि उत्तरप्रदेशातून-उत्तराखंड निर्माण करून पूर्ण केले आहे. हेच जर त्यावेळेस झाले असते तर उत्तरप्रदेशांचा समतल विकास झाला असता. मोठे राज्य ठेवल्याने काही मागास भाग राहिलेले आहेत. उत्तरप्रदेश, बिहार, मध्यप्रदेश मोठे राज्य असल्याने शासनाच्या योजना दुर्गम, पहाडी भागातील जनतेपर्यंत जाऊन पोहोचण्यास अडचणी आल्या. त्यामुळे आज या तिनही राज्यात औद्योगिकरण नाही, पायाभूत सुविधा नाहीत, रोजगाराच्या संधी नाहीत. आज त्या राज्यांची जी दुर्दशा आहे ती राहीली नसती. मायावतींनी उत्तरप्रदेशातून चार राज्यांची मागणी केली असली, तरी आजच्या परिस्थितीत दोन राज्ये करणे आवश्यक आहेत. चार राज्य करणे विभिन्न कारणाने हानिकारक ठरू शकतात.

आजच्या परिस्थितीत छोटे राज्य निर्माण करणे कसे अडचणीचे आहेत. त्यात पहिला मुद्दा असा की, छोटी राज्य निर्माण करून त्याची पुनर्रचना करणे, सीमा निश्चित करणे हे गुंतागुंतीचे ठरू शकते. त्यामुळे आंतरराज्यीय तंट्यात वाढ होते. दुसरा मुद्दा असा की, अशी छोटी राज्ये निर्माण केल्याने लोकांच्या स्थितीत सुधारणा होणार नाही. अथवा विकासही होणार नाही. मुळात विकास करण्यासाठी छोट्या राज्यांची आवश्यकता नाही तर नेत्यांची मानसिकता, शासकीय अधिकाऱ्यांचा दृष्टीकोण, निवडणुकीत योग्य उमेदवाराला निवडून देणे, विरोधी पक्षांची जागरूकता, धर्मनिरपेक्षवादी राजकारण आणि मिडियांची निपक्षपाती योग्य भूमिका यावर अवलंबून आहे. बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार आणि गुजरातचे नरेंद्र मोदी यांनी इच्छाशक्ती आणि प्रभावी नियोजनाने विकास करता येतो हे दाखवून दिलेले आहे. अशी छोटी

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist.Nanded

राज्य निर्माण केल्याने राजकीय नेत्यांचे राजकीय स्वार्थ मात्र पूर्ण होऊ शकतात. मुख्यमंत्री, राज्यपाल, मंत्री या पदांची संख्या वाढते. प्रशासकीय यंत्रणा उभी राहते. तिसरा मुद्दा असा की, छोटी राज्य निर्माण केली तर त्या राज्याची पुनर्रचना प्रशासकीय यंत्रणेची उभारणी करणे यासाठी कायदा व सुव्यवस्थेसाठी भरपूर पैसा लागतो. त्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या पायाभूत सुविधांच्या विकासाकडे दुर्लक्ष होते. तसेच त्या-त्या राज्याची आर्थिक शक्ती ही त्या राज्यातील नैसर्गिक साधन संपत्ती, औद्योगिक उत्पादन यावर अवलंबून आहे. दुर्बल राज्यांना केंद्राच्या मदतीवर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे केंद्र सत्ता प्रबळ होते. तसेच सध्याच्या आघाड्याच्या राजकारणात केंद्राकडून कसा न्याय मिळेल हा ही एक प्रश्न निर्माण होतो. अशी आर्थिकदृष्ट्या कमजोर राज्य विकास कामे तीव्रगतीने करू शकत नाहीत. चौथा मुद्दा असा की, छोट्या राज्यांमुळे राजकीय अस्थिरता निर्माण होवू शकते. सध्याच्य पक्ष पध्दतीच्या स्वरुपामुळे राष्ट्रीय आणि राज्य राजकारणात आघाड्यांची सरकारे आलेली आहेत. आघाडी सरकारच्या अनेक मर्यादा असतात. त्यामध्ये राहून विकासकामे करणे मोठे मुश्कील आहे. कारण प्रत्येक धोरणे वा निर्णय घेताना संवादाच्या मार्गाने घेणे, त्यावरचे मतभेद लक्षात घेता अवघड जाते त्यामुळे विकासकामाला गती मिळत नाही. जर आघाडी बिघडली तर मग राजकीय अस्थिरता निर्माण होते. उदा. गोव्यात १९९० ते २००५ पर्यंतच्या १५ वर्षाच्या काळात १४ वेळा सत्तांतर झालेले आहे. सध्या मात्र भाजपाचे पहिल्यांदा बहुमताचे सरकार आहे. झारखंडमध्येही आतापर्यंत १० वेळा सत्तांतर झालेले आहे. तसेच उत्तरपूर्वेकडील राज्येही अस्थिरतेने ग्रासलेली आहेत. पाचवा मुद्दा असा की, छोट्या राज्यात स्थानिक बहुसंख्याक, प्रभुत्वशाली जाती. हितसंबंधी गट आणि धर्माचा राजकारणावर प्रभाव पडून राजकारण अशा जाती-गटांच्या हिताभोवती फिरताना दिसते. त्यांचाच प्रभाव राजकारणात, उद्योगात दिसतो. अशा राज्यांत अल्पसंख्याकाच्या हिताकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. सहावा मुद्दा असा की, मागास भूभागांसाठी जी संविधानात्मक व्यवस्था केलेली आहे. त्यात वैधानिक मंडळे, विकासाचे विशेष निधीचे पॅकेज, प्रादेशिक मंडळे ही म्हणावी तेवढी यशस्वी झालेली नाहीत. कारण पक्षीय स्वार्थी हितसंबंधाच्या राजकारणामुळे या योजना कोलमडल्या आहेत. त्याला हजारो कोटींचा वाढता अनुशेष, भ्रष्टाचाराची वाढती प्रकरणे, यामुळे सरकारचा विकास निधी नेते-कंत्राटदार आणि कर्मचाऱ्यांच्या खिशात जात आहे. जनतेचा विकास नावालाच राहतो. बुंदेलखंडचा ७,२६६ कोटी रुपयाचा निधी नेते-कंत्राटदाराच्या खिशात गेलेला आहे. विकासासाठी प्रबळ इच्छशक्ती नियोजनपूर्वक विकास योजना आखणे, वाढत्या भ्रष्टाचाराला रोख लावणे आवश्यक आहे. विकासासाठी स्वतंत्र राज्य मागणे हा एकमेव पर्याय होवू शकत नाही.

छोटी राज्य निर्माण केले तर अस्मितांचे राजकारण वाढू शकते. ही राजकारणांच्या आकांक्षेचे केंद्रे बनतात. असे विभाजन अनेक नव्या वादाला जन्म देवू शकते. त्यामुळे नवे राज्य निर्माण करण्यापेक्षा स्थानिक स्तरावर पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर वैधानिक विकास मंडळाच्या अंमलबजावणीती त्रुटी कमी करून ते मजबूत करणे, विशेष आर्थिक तरतूद करणे, कार्यक्षमता कशी वाढवता येईल, भ्रष्टाचार कसा कमी करता येईल. विकास योजनांना तीव्र गती कशी मिळेल हे पाहिले पाहिजे. तसेच स्थानिक समस्या व गरजांनुसार प्रशासकीय यंत्रणा लवचिक करणे गरजेचे आहे. असे झाले तर विकासासाठी स्वतंत्र राज्याची गरज भासणार नाही.

संदर्भ :


- माधव चोले (मे २०१२) : छोट्या राज्यनिर्मितीचे वाढते बहुआयामी पेच, *नवभारत*, प्राज्ञ पाठशाळा मंडळ, वाई.
- अर्थबोध पत्रिका, खंड ९वा, अंक ७, ऑक्टो. २०१०.
- B. R.Arnbedkar. (1953), Thoughts on Linguistic States.
- बिपीनचंद्र (२००४) : इंडिया ऑफ्टर इंडिपेंडन्स, के. सागर प्रकाशन, पुणे.
- अभिषेक देवराव चव्हाण (डिसेंबर २०१०) : ईशान्य

भारतातील फुटीरतेच्या चळवळीचे अध्ययन, योजना विशेषांक, मुंबई.

- जे.बी. भट्टाचार्य (२० ऑगस्ट, २०११) : ईशान्य भारतातील बंडखोरी (मुळ कारणांचा शोध) शोध यात्रा, साधना, पुणे.
- Guatan Pingale (Jan-December 2009) : The Telgana Tragedy, A Lesson in Integration and Disintegration, Vol-XXI, Journal of Indian School of Political Economy, Pune.
- Louise Tillin, (May 14, 2011) : Statehood and the Politics of Intent, Vol. XLVI, No. 20, EPW.
- Nilkanth Rath (Jan-Dec.2009) : Sperarion is no solution to the problem of regional imbalance in Development, Vol-XXI, Journal of Indian School of Political Economy, Pune.
- Prakash Ambedkar, (Jan-Dec.2009) : On Small States, Vol-XXI., Journal of Indian School of Political Economy, Pune.
- P.R. Panchmukhi (Jan-Dec.2009) : Regional Justice Perspectives and the issue of states recorganisation. in India : A Revisit, Vol-XXI, Journal of Indian School of Political Economy, Pune.
- R.P.Kurulkar (Jan-Dec.2009) : The Problem of Regional Disparities in Maharashra State and the Role of the Regional Development Boards, Vol.-XXI, Journal Indian of Political Economy, Pune.
- R.LPitale. (Jan-Dec.2009) : Why Vidarbha State Failure of article 371 (2) of the Constitution : Vidarbha state is the only alternative, Vol-XXI, Journal of Indian School of Political Economy, Pune.

Formation of New State : Reorganisation of State, Vol. XXI, Journal of Indian School of Political Economy, Pune.

- अभय टिळक, (जाने. २०११), अर्थबोधपत्रिका, खंड ९ (अंक ९,१०,१२), पुणे.
- अशोक चौसाळकर (फेब्रु. २०१०) : तेलंगणाचा तिढा, प्रबोधन प्रकाशन, कोल्हापूर.
- २७ नोव्हें. २०११, छोट्या राज्यांचा मोठा पेच, महाराष्ट्र टाईम्स, मुंबई.
- उदय नारकर (फेब्रु. २०१०) : स्वतंत्र तेलंगणा चळवळ : ऐतिहासिक पार्श्वभूमी, प्रबोधन, कोल्हापूर.
- धनंजय कुळकर्णी, (२०१०) : तेलंगणा अहवालामुळे गुंताच वाढला, महाराष्ट्र टाईम्स, मुंबई.
- नरेंद्र दाभोळकर (संपा.) १४ व २१ ऑक्टोबर २०१०, विदर्भाला सुखी करा, वर्ष ६३, अंक १९२, साधना साप्ताहिक, पुणे.


●●●

## साभार पोच

१) प्रकाशन एवं लोकनीति (२०१०) : मनोज सिन्हा, ओरिएंट व्लैकस्वॉन, नई दिल्ली, पृ. ३०४, किं. रु. २२५/-

२) आपत्ती व्यवस्थापन (२०१२) : संभाजी खराट, प्रतिमा प्रकाशन, पुणे, पृ. २५६, किं. रु. ३००/-

३) मानवी संसाधन व्यवस्थापन (२०१५) : प्रभाकर हरकळ आणि जी.डी. चौधरी, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पृ. ३३०, किं. रु. २५०/-

४) भक्ती आणि धम्म (२०१६) : रावसाहेब कसबे, लोकवाङ्मय गृह, मुंबई, पृ. ६६४, किं. रु. ९७५/-

5) Dr. B.R. Ambedkar - An Intellectual Biography of Ideas, Enlightenment, Life and


Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded